नि. दि. दावा क्र.१०३/२०१८
लक्ष्मण व इतर वि. सूर्यभान व इतर
CNR-MHJNO20005252018

## निशाणी क्र.२३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होण्यासाठी तसेच लेखी कैफीयत दाखल करण्यासाठी उशीर माफ होण्यासाठी दाखल केला आहे.

२) प्रतिवादी त्यांच्या अजार्मध्ये असे कथन करतात की, ते वयोवृध्द आहेत व सततच्या आजारपणामुळे विहीत वेळेत ते दाव्यात हजर होवू शकले नाही. करीता त्यांनी त्यांच्याविरूध्द दाव्यामध्ये झालेला एकतर्फा आदेश रद्द करून त्यांचा लेखी जबाव नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने पटलावर घेण्याची विनंती केली आहे.

३) वादीने अजार्स तीव्र आक्षेप घेतला आहे. प्रतिवादी क्र.१ ला दि.३१/११/२०१८ रोजी समन्स तामीळ झाले आहे. प्रतिवादी क्र.१ चा अर्ज हा मोघम स्वरूपाचा आहे. करीता त्यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४) अर्जाचे व दाव्याच्या कागदपत्राचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा दावा मिळकतीचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दिनांक १३/११/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.१ यांना दावा समन्सची बजावणी झाली मात्र त्यानंतर ते दाव्यात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरूध्द निशाणी क्र.१ वरील आदेशाप्रमाणे दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झाला आहे. एकुणच पाहता यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचा हलगर्जीपणा झाल्याचे दिसुन येते. परंतु, दाव्याचे स्वरूप पाहता, प्रतिवादी क्र.१ विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द केला नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांचा कायदेशीर अधिकारावर गदा येईल. तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.१ यांना बचावाची संधी देणे विधिसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता व दाव्याचे स्वरूप पाहता, प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. परंतु, त्यांनी न्यायालयात विहीत वेळेत हजर न

झाल्यामुळे व त्यांचा लेखी जबाव विहीत मुदतीत दाखल न केल्यामुळे वादीचा वेळ वाया गेला, त्यामुळे सदर बाबीची वादीना भरपाई होणे देखील आवश्यक आहे. म्हणुन अर्ज खर्चाचा आदेशासह मंजुर करणे न्यायाचित होईल. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | अर्ज निशाणी क्र.२३ मंजुर करण्यात येतो. |
| २ | प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो. त्यांनी खर्च म्हणून रूपये ५००/– (अक्षरी रूपये पाचशे फक्त) वादीला पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दयावे व त्यानंतर त्यांचा लेखी जबाव स्वीकारण्यात येईल. |

स्वाक्षरीत/–

(**आर. व्ही. निकम**)

दिनांक २२/१०/२०२१

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

घनसावंगी